**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

पोलीस स्टेशन, ताडकळस. ता. पूर्णा जि. परभणी.

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** परभणी  **P.S.(ठाणे):** तडकलास

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0159  **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/08/2024 19:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):** पहर 4

**Date From (दिनांक पासून):** 01/08/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/08/2024

**Time From (वेळेपासून):** 12:58 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:58 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/08/2024  **Time (वेळ):** 13:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 025

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/08/2024 19:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 0.500 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जिल्हा परिषद शाळेजवळील, सार्वज, ताडकळस,पुर्णा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** गंगाप्रसाद संभाजी गुंजकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | इंडियन पेट्रोल पंम्पाच्या मागे,ताडकळस,तडकलास,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | इंडियन पेट्रोल पंम्पाच्या मागे,ताडकळस,तडकलास,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9921436977

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दत्ता संतराम होनमने | | | 1. ताडकळस,पुर्णा,तडकलास, परभणी,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 40,000/ रुपये लाचेची रक्कम न्थ्रासिन पावडर लागलेली. | 40,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

40,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 1/08/2024

मी गंगाप्रसाद संभाजी गुंजकर, वय 40 वर्ष, व्यवसाय- शेती व ग्राहक सेवा केंद्र, रा. फुलकळस, ता. पुर्णा, ह.मु. इंडियन पेट्रोल पंम्पाच्या मागे, ताडकळस, ता. पुर्णा, जिल्हा परभणी. मोनं. 9921436977, 9421444245.

समक्ष पोलीस स्टेशन ताडकळस, जि. परभणी येथे हजर येवून फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असून शेती व ग्राहक सेवा केंद्र चालवतो. मी ए.सी.बी. कार्यालय परभणी येथे दि.29/07/2024 रोजी तक्रार दिली की, मौ. फुलकळस शिवारात माझे पत्नीचे नावे शेत गट क्र. 04 मध्ये 2015 मध्ये काशीनाथ नारायण शिराळे यांचेकडून 01 गुंठा इतकी जमीन, तसेच सन 2018 मध्ये शिवनंदा सदाशिव शिराळे, रा. फुलकळस यांचेकडून 01 गुंठा जमीन अशी एकूण दोन गुंठे जमीन कायम विक्री करारनामाद्वारे विकत घेतलेली आहे.

बँकेच्या कामाकरिता सदर जमीन गाव नमूनाच्या सातबारा वर नोंद करून घ्यावयाची असल्याने सदर जमीनीचा फेरफार होवून सातबारा मिळण्यासाठी मी आमचे गावचे तलाठी होनमने यांना दि.05/07/2024 रोजी ताडकळस येथे त्यांचे खाजगी कार्यालयात भेटून त्यांना खरेदीचे कागदपत्रे देवून फेरफार होवून मिळणेची विनंती केली. त्यानंतर दि.22/07/2024 रोजी मी माझे पत्नीचे कामानिमित्त तलाठी दत्ता होनमने यांना भेटलो असता त्यांनी मला म्हणाले, ही हायवेला लागून असलेली जमीन आहे, याचा फेरफारसाठी तुम्हाला 80,000/- रूपये मला द्यावे लागतील. त्यावर मी विचार करून सांगतो असे म्हणुन निघून आलो होतो.

त्यानंतर मी दि. 24.07.2024 रोजी मी ए.सी.बी.चे वेबसाईटवर थोडक्यात तक्रारी अर्ज केला आहे. तसेच सदर कामासाठीच माझे पत्नीचे नावे मा. तहसीलदार, पुर्णा यांचे कार्यालयात दि.25.07.2024 रोजी लेखी अर्ज दिला आहे. माझे पत्नीचे नावे फेरफारसाठी तलाठी होनमने हे 80,000/-रूपये लाच मागत असुन त्याचेवर कायदेशीर कार्यवाही करावी.

त्यावरून लागलीच दि.29/07/2024 रोजी पो.नि. श्री. जकिकोरे, एसीबी., परभणी यांनी तात्काळ सहायक निबंधक सहकारी संस्था, ता.जि. परभणी येथील कार्यालयातील 1) श्री बंडू त्र्यंबक लिंगायत व 2) श्री शैलेंद्र मारोतराव कनसटवाड यांना शासकीय पंच म्हणुन उपलब्ध करून घेतले. सापळा अधिकारी यांनी दोन्ही पंचांची व माझी ओळख करून दिली. पंचाना मी तक्रारीबाबत तोंडी माहिती दिली. त्यानंतर मी, दोन्ही पंच, व सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार असे एसीबी कार्यालयातील खाजगी वाहनाने सापळयाकरीता लागणारे सर्व साहीत्यासह पिंगळी मार्गे ताडकळस येथे पोहचून ताडकळस ते महागाव जाणा-या रस्त्याने आत जावुन एका शेताच्या बाजुस आडोशाचे ठिकाणी खाजगी वाहन थांबविण्यात आले. त्यानंतर केलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान मी, पंच क्र. 1 लिंगायत यांचेसोबत व्हाईस रेकॉर्डरसह तलाठी होनमने यांना ताडकळस येथील जिल्हा परिषद शाळेजवळील त्यांचे खाजगी कार्यालयाकडे भेटण्यास गेलो असता त्यांचे खाजगी कार्यालय बंद दिसले. ते परभणीला असल्याचे माहिती मिळाल्याने सदर दिवशीची कार्यवाही थांबवून दुस-या दिवशी कार्यवाही करण्याचे ठरले. तसा सवीस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

दि. 30/07/2024 रोजी तलाठी होनमने हे त्यांचे ऑफीसच्या कामासाठी बाहेर जाणार आहेत ते ताडकळस येथे येणार नसल्याने सदर दिवशीची कार्यवाही स्थगित करणेबाबत मी सापळा पथकास फोनद्वारे कळविल्याने त्या दिवशीची कार्यवाही स्थगीत करून दुस-या दिवशी दि. 31/07/2024 रोजी पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरले.

दि. 31/07/2024 रोजी सापळा कार्यवाही पथक ताडकळस येथे आल्याने केलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान मी व पंच क्र. 1 लिंगायत असे व्हाईस रेकॉर्डरसह तलाठी होनमने यांना ताडकळस येथील जिल्हा परिषद शाळेजवळील त्यांचे खाजगी कार्यालयाकडे भेटण्यास गेलो असता पुन्हा कार्यालय बंद दिसून आले. त्यानंतर आम्ही आजुबाजूस पाहिले असता ते दिसून आले नाहीत. त्यांचे फोन लागत नसल्याने बराच वेळ वाट पाहूनही भेट न झाल्याने सदर दिवशीची कार्यवाही थांबवून दुस-या दिवशी दि.01/8/2024 रोजी कार्यवाही करण्याचे ठरले.

सापळा अधिकारी यांनी तसा सवीस्तर पंचनामा केला आहे.

दि. 01/08/2024 रोजी सापळा कार्यवाही पथक ताडकळस येथे आल्याने ताडकळस येथील इंडीयन पेट्रोल पंपाच्या मागे असलेल्या माझे राहते घरी गोपनीयतेच्या अनुशंगाने सापळा पथकाला बोलावून पडताळणी कार्यवाही सुरू करण्यात आली. सापळा अधिकारी यांचे सुचनेप्रमाणे पडताळणी कार्यवाही दरम्यान मी व पंच क्र. 1. लिंगायत असे व्हाईस रेकॉर्डरसह तलाठी होनमने यांना ताडकळस येथील जिल्हा परिषद शाळेजवळील त्यांचे खाजगी कार्यालयाकडे भेटण्यास गेलो. तेथे त्यांची भेट झाली असता भेटी दरम्यान तलाठी होनमने यांचेसोबत माझे पत्नीचे कामासंबंधी चर्चा झाली. त्या दरम्यान त्यांनी मला शेतीच्या सातबाराला फेर ओढण्याकरीता 80,000/-रूपये लाचेची मागणी पंचासमक्ष केली व सर्व रक्कम एकदाच केले तर बरे होईल असे म्हणून लाच रक्कम घेवून येण्यास सांगीतले. त्यावेळी मी त्यांना त्यापैकी 40,000/- रूपये आता देतो व उर्वरीत रक्कम काम झाल्यानंतर देतो असे म्हणून 40,000/- रूपये घेवून थोडयावेळाने येतो असे म्हणून सापळा पथक थांबलेले ठिकाणी परत आलो. पडताळणी कार्यवाही दरम्यान माझे व तलाठी होनमने यांचे पंच क्र. 1.लिंगायत यांचे समक्ष झालेले संभाषण डिजिटल व्हाईस रेकॉर्डरच्या सहाय्याने मेमरीकार्डमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे. तसा सविस्तर पडताळणी पंचनामा सापळा अधिकारी यांनी केलेला आहे.

त्यानंतर लागलीच सापळा अधिकारी यांनी तलाठी होनमने यांचेवर सापळा आयोजीत केला. तलाठी होनमने यांनी मला पडताळणी कार्यवाहीवेळी 80,000/-रूपये लाचेची मागणी केल्याने त्यापैकी 40,000/-रूपये रक्कम आता देण्याचे ठरल्याप्रमाणे 40,000/-रूपये रक्कम लाच म्हणुन देण्याकरीता पंचासमक्ष हजर केल्या. सापळा कार्यवाही दरम्यान मला, पंचांना व सापळा पथकास प्रत्येकाच्या कामाबाबत सापळा अधिकारी यांनी सुचना दिल्या. तसेच अॅन्थ्रॉसिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे गुणधर्म व वापराबाबत माहिती देवून त्यांचे प्रात्यक्षीक करून दाखविण्यात आले. लाचेच्या 40,000/-रूपये ज्यामध्ये 500/-रूपये दराच्या 80 चलनी नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावून ती रक्कम माझेकडे देवून व्हाईस रेकॉर्डरसह मला व पंच क्र. 1 लिंगायत यांना तलाठी होनमने यांना लाचेची रक्कम देण्यासाठी त्यांचे ताडकळस येथील जिल्हा परिषद शाळेजवळील सार्वजनीक वाचनालयाचे लगत असलेले तलाठी होनमने यांचे खाजगी कार्यालयात पाठविले. आमचे पाठोपाठ सापळा पथक निघाले. आम्ही तलाठी होनमने यांचे खाजगी कार्यालयाजवळ पोहचताच सापळा पथक आमच्यावर लक्ष ठेवून आजुबाजूला थांबले.

मी व पंच क्र. 1 लिंगायत असे तलाठी होनमने यांचे खाजगी कार्यालयात जावून त्यांना माझे काम लवकर करण्यासंबंधी विनंती करून माझे कडील रक्कम त्यांचे समोर धरली असता सदर रक्कम त्यांनी त्यांचे कामाचे टेबलाचे ड्रॉव्हर मध्ये ठेवणेबाबत हाताचे इशा-याने खुणविले. त्याप्रमाणे 40,000/-रूपये मी अर्धवट उघडया असलेल्या टेबलाचे ड्रॉव्हर मध्ये ठेवले. त्यावेळी मी बोलत बोलत खाजगी कार्यालयाचे समोर येवून माझे गळयातील मोठा रूमाल काढून हातात घेवुन पुर्वनियोजीत इशारा केला. तो इशारा पाहून सापळा पथकातील सर्व स्टाफ तलाठी होनमने यांचे कार्यालयासमोर आम्ही थांबलेल्या ठिकाणी आले व सापळा पथकाने तलाठी होनमने यांना ताब्यात घेतले व 12.58 वाजता माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केला. त्यांनतर सापळा पथक तलाठी होनमने यांना त्यांचे परिचय देवून पंचाला व मला रक्कम कोणी स्वीकारले व कोठे ठेवले असे विचारणा केली असता मी तलाठी होनमने यांचे सांगणेप्रमाणे टेबलाचे ड्रॉव्हर मध्ये ठेवल्याचे सांगून हाताने दर्शवून ड्रॉव्हर दाखविले. त्यावेळी पंच क्र. 2 कनसटवाड यांनी सदर टेबलाचे ड्रॉव्हर उघडून पाहीले असता त्याठिकाणी मी ठेवलेली लाच रक्कम आढळून आली. त्यानंतर सदर 40,000/-रूपयांच्या नोटांवर अॅल्ट्राव्हायलेट लॅम्पचा प्रकाश टाकला असता नोटांवर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर सापळा अधिकारी यांचे सुचनेनुसार पंच क्र. 2 कनसटवाड यांनी त्या नोटा स्वतःकडे घेवून त्यांचेकडील नोटांचे नंबर लिहिलेले कागदावरून सदर नोटांचे नंबरची पडताळणी केली असता ती लाचेची रक्कम असल्याची खात्री झाली आहे. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. जकिकोरे साहेबांनी तलाठी होनमने यांना त्यांचे पुर्ण नाव गाव विचारले असता त्यांनी आपले नाव दत्ता संतराम होनमने, वय 47 वर्श, पद-तलाठी, सज्जा फुलकळस अतिरिक्त पदभार कळगाव, ता. पुर्णा, जिल्हा परभणी. रा. ताडकळस, ता.पुर्णा, जि.परभणी, सध्या राहणार-पोलीस मुख्यालयाचे बाजूस, सरफराज नगर, अशोक संतराम होनमने यांचे निवासस्थान, परभणी, ता.जि. परभणी असे सांगितले.

दि. 29/07/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी येथे मी दिलेल्या तक्रारीवरून दि. 01/08/2024 रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही वेळी दत्ता संतराम होनमने, वय 47 वर्श, पद-तलाठी, सज्जा फुलकळस अतिरिक्त पदभार कळगाव, ता. पुर्णा, जिल्हा परभणी, रा. ताडकळस, ता.पूर्णा, जि. परभणी, सध्या राहणार.-. पोलीस मुख्यालयाचे बाजूस, सरफराज नगर, अशोक संतराम होनमने यांचे निवासस्थान, परभणी, ता.जि. परभणी यांनी माझे पत्नीचे नावे खरेदी केलेल्या शेत जमीनीचे फेरफारचे काम करण्यासाठी 80,000/-रूपये लाचेची मागणी करून सापळा कार्यवाही दरम्यान ताडकळस येथे जिल्हा परिषद शाळेजवळील,

सार्वजीनक वाचनालय लगत असलेल्या त्यांचे स्वतःचे खाजगी कार्यालयात पंच क्र. 1 लिंगायत यांचे समक्ष 12.58 वाजेदरम्यान 40,000/-रूपये लाचेची रक्कम स्वतः स्विकारली आहे.म्हणून त्यांचे विरूध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता फिर्याद देत आहे.

माझी फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली आहे. मी ती वाचून पाहिली माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

kapil punjaram shelke(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

01-08-2024

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

पोउपनि गजानन कांठवाडे पो.स्टे. ताडकळस परभणी.

**Name** (नाव): kapil punjaram shel

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):